# -: योजनेचे उद्दिष्ट व महत्व :-

- **योजनेचे उद्दिष्ट :-** इयत्ता १० वीच्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुद्धिमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुद्धिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा करावी, ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

- **निवडपध्दती :-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांचेमार्फत २०१२-१३ पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी दोन स्तरावर घेण्यात येते. अ) राज्यस्तर ब) राष्ट्रीयस्तर

- **शिष्यवृत्ती :-** अखिल भारतीय पातळीवर अंदाजित शिष्यवृत्ती संख्या २००० असून यासाठी SC साठी १५%, ST साठी ७.५%, केंद्रीय सूचीनुसार (Non-creamy layer) OBC साठी २७% आणि EWS (Economically Weaker Section) १०% शिष्यवृत्त्या आरक्षित असतील. तसेच संबंधित संवर्गात ४% दिव्यांगासाठी आरक्षण असेल.

- **प्रमाणपत्र :-**
  a) राज्यस्तर परीक्षेतून राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल.
  b) राष्ट्रीयस्तर परीक्षेतून शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्ह्याच्या पालकमंत्र्याच्या हस्ते प्रमाणपत्र दिले जाईल.

- **शिष्यवृत्ती दर :-** शिष्यवृत्ती धारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रु. |
|---|---|---|
| १ | शालान्त परीक्षेनंतर + २ स्तरावर दोन वर्ष (इ. ११ वी व इ. १२ वी) | १२५०/- |
| २ | सर्व शाखांच्या प्रथम पदवीपर्यंत (उदा. B.A., B.COM., B.Sc.) | २०००/- |
| ३ | सर्व शाखांच्या द्वितीय पदवीपर्यंत (पदव्युत्तर पदवीपर्यंत) | २०००/- |
| ४ | Ph.D. साठी ४ वर्षापर्यंत (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे नियमानुसार मान्य दराने |